Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

**महत्वाचे परीक्षा प्राधान्य**

क्र. कोविमं/ए-२/ १२ वी/१०वी/गोप./प्रात्य./तोंडी/ 2038
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक: 08/06/2026

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी ) पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ च्या प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रकाबाबत......**

संदर्भ :- १. राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/२०१५, दिनांक १२.०५.२०२६ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) जून-जुलै २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षा खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.

**इ.१२ वी**

| अ.क्र. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| ०१ | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार दिनांक १६ जून,२०२६ ते बुधवार दिनांक ०८ जुलै,२०२६ |
| ०२ | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ०३ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी ) सर्वसाधारण व द्विलक्षी विषय व ऑनलाईन परीक्षा | |
| ०४ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी ) व्यावसायिक विषय | |
| ०५ | I.T. विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ०६ | G.K. विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा | |

**इ.१० वी**

| अ.क्र. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| ०१ | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार दिनांक १६ जून,२०२६ ते मंगळवार दिनांक ३० जून,२०२६ |
| ०२ | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ०३ | शरीरशास्त्र,आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ०४ | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार दिनांक १६ जून,२०२६ ते गुरुवार दिनांक २५ जून,२०२६ |

**** परीक्षेसंदर्भात महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे- ****

१. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून **इ.१०वी व इ. १२ वी ची प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा देखील संबंधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये घेण्यात यावी.** याबाबत संदर्भ- पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/५५०८, दिनांक २६.१२.२०२३ नुसार सर्वांना कळविण्यात आलेले आहे.

२. **इ.१०वी व इ. १२ वी** ची प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार checker/maker याचा अवलंब करून online पध्दतीने मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या

संकेतस्थळावर www.mahahsscboard.in यावर उपरोक्त दिलेल्या दिनांकानुसार संबंधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत घेण्यात यावी.

| अ.क्रं | प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने PORTAL वर गुण नोंदवण्याचा कालावधी | प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे गुणतक्ते व इतर साहित्य जमा करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १. | **मंगळवार दिनांक १६ जून,२०२६ ते मंगळवार दिनांक ३० जून,२०२६ (१० वी)** | **गुरुवार ०९ जुलै, २०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०४.०० वा.** संबंधित वितरण केंद्रावर |
| २. | **मंगळवार दिनांक १६ जून,२०२६ ते बुधवार दिनांक ०८ जुलै,२०२६ (१२ वी)** | |

३. प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे गुण फेब्रुवारी - मार्च २०२६ परीक्षेप्रमाणेच OMR Sheet ऐवजी PORTAL वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

४. **परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा OUT OF TURN ने आयोजित करण्यात येणार नाही.** तरी विद्यार्थी संख्येनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी.

५. इ.१० वी व इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून ज्या त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

६. इ.१२ वी माहिती तंत्रज्ञान (IT) व सामान्यज्ञान (GK) या विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने **दिनांक ०७ जूलै, २०२६ व दिनांक ०८ जूलै,२०२६** रोजी घेण्यात येणार आहे.सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा क.महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात येईल.क. महाविद्यालयांना संगणक प्रयोगशाळेच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करून त्याप्रमाणे क. महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी याची माहिती परीक्षेपूर्वी करून द्यावी.

७. इ.१० वी च्या **दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण** विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा मंगळवार दिनांक १६ जून, २०२६ ते गुरूवार दिनांक २५ जून, २०२६ यावेळेत शालेय स्तरावर आयोजित करण्यात यावी.

८. इ.१० वी व इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षेचे सर्व साहित्य **शुक्रवार दि.१२/०६/२०२६** रोजी वितरण केंद्रावर वितरण करण्यात येणार आहे. कोल्हापूर जिल्हयातील करवीर, पन्हाळा,कागल,शाहूवाडी,कोल्हापूर शहर व गगनबावडा या तालुक्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे साहित्य **शुक्रवार दि.१२/०६/२०२६** रोजी विभागीय मंडळ कार्यालयात वाटप करण्यात येईल.

इ.१० वी व इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षोत्तर सर्व साहित्य **गुरुवार ०९ जुलै, २०२६** रोजी वितरण केंद्रावर जमा करावयाचे आहे. तसेच वितरण केंद्र प्रमुखांनी बुधवार दि.शुक्रवार दि.१० जुलै,२०२६ रोजी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयनिहाय सर्व साहित्य मंडळ कार्यालयात जमा करावयाचे आहे.

विभागीय सचिवाकरिता
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर